# मातोश्री

डॉ. स्मिता दामले

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

A 126

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**मातोश्री : डॉ. स्मिता दामले**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
₹ ४४०/-

वाचन आणि त्यावर चिंतन याचा वारसा ज्यांच्याकडून मिळाला ते
माझे वडील,
''कै. डॉ. गुरुनाथ व्यंकटेश दिवेकर''
यांस सादर अर्पण...

**– डॉ. स्मिता दामले**

## दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

'मातोश्री'ची दुसरी आवृत्ती वाचकांसमोर ठेवताना मला विशेष आनंद होत आहे.

'मातोश्री'ची पहिली आवृत्ती वितरित झाल्यानंतर, मला अनेकांच्या प्रतिक्रिया ऐकायला व वाचायला मिळाल्या. बहुतेक वाचकांनी व समीक्षकांनी कौतुक व अभिनंदनच केले; परंतु त्यातच काहींनी केलेल्या सूचना आणि दाखवलेल्या त्रुटी यांचा मला खास फायदा झाला. ही दुसरी आवृत्ती काढताना, या सर्वांचा योग्य तेथे उपयोग करून बदल व सुधारणा केल्या आहेत. अनेक वाचकांनी केलेल्या सूचनांनुसार कादंबरीच्या शेवटी पेशवे-भट घराण्याची माहिती परिशिष्टात दिली आहे. शाहूराजापासून भट, फडणीस, होळकर, शिंदे, पवार, भोसले, दाभाडे, निजाम, अशा अनेक ऐतिहासिक घराण्यांचा उदय सांगणारी ही कादंबरी वाचकांना आवडली.

पहिल्या आवृत्तीप्रमाणेच या दुसऱ्या आवृत्तीचेही वाचक स्वागत करतील अशी आशा आणि अपेक्षा आहे.

**– डॉ. स्मिता दामले**

## वाचण्यापूर्वी चार शब्द...

एखाद्या घनदाट वृक्षवेलींच्या वनराईत रमणारी पाखरे, त्याच अरण्यातली काष्ठे, पुष्पे, पर्ण गोळा करून घरटी बांधतात. ते घरटे बांधण्याचा, त्यात विसावण्याचा आनंद उपभोगतात.

प्रस्तुत लेखन 'मातोश्री' हेही त्याच वळणावरचे आहे. 'नवीन संदर्भासह संपादित केलेली मराठी रियासत' याचे आठ खंड इ. स. १९८९ मधे प्रकाशित झाले. ते आठही खंड वाचून झाल्यावर मराठ्यांच्या पराक्रमाची, उणिवांची, बदलत्या काळानुसार नवीन वळणे घेत जाणाऱ्या मराठी राजकारणाची नव्याने ओळख झाली. ते खंड वाचून झाल्यानंतर त्यातील संदर्भाच्या पुस्तकांची नामावली घेऊन 'मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालया' च्या नायगाव शाखेत जाऊन ती सारी पुस्तके वाचून काढली.

मराठी रियासत, मराठ्यांच्या इतिहासाची साधने, पेशवे दप्तर, ऐतिहासिक पत्रे, यादी, टिपणे, बखरी, रोजनिशी इ. जुन्या पुस्तकांपासून पेशवेकालीन स्त्रिया, पेशवेकालीन समाज, पेशवे घराण्याचा इतिहास इ. आधुनिक पुस्तकांपर्यंतच्या घनदाट पर्णछायेत शिरल्यावर अनेक वाटा दिसल्या. त्यातील काही नवीन होत्या. काही वाटा मळलेल्या होत्या.

शिवाजी महाराजांच्या लोकोत्तर कर्तृत्वाची ओळख जुनी होती. लहानपणी श्री. बाबासाहेब पुरंदऱ्यांच्या झपाटून टाकणाऱ्या व्याख्यानमालेतल्या आठवणी मनात अजून रुतून रेंगाळत होत्या. पण संभाजी महाराजांपासून प्रतापसिंह महाराजांपर्यंतची आणि बाळाजी विश्वनाथ पेशव्यांपासून दुसऱ्या बाजीरावांपर्यंतच्या साऱ्या व्यक्तींची, सरदारांची, अनेक घराण्यांची नव्याने ओळख झाली. कर्नाटक, उत्तर हिंदुस्थानातली राजकारणे कळली. ताराबाई, कोल्हापूरच्या राणीसाहेब–जिजाबाई, उमाबाई दाभाडे, सकवारबाई अशा अनेक कर्तृत्ववान स्त्रियांची कर्तबगारी वाचायला मिळाली.

राधाबाई बाळाजीपंत भट. प्रस्तुत लेखनाच्या या नायिका, त्याही अशाच कर्तृत्ववान होत्या. 'पेशवाई'चे संस्थापक बाळाजी विश्वनाथ यांच्या या पत्नी, बाजीराव आणि चिमाजीअप्पांच्या या मातोश्री आणि पेशवे बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे यांच्या या आजी होत्या. राधाबाईंनी आपल्या घरातल्या या तीन पेशव्यांची कारकीर्द स्वत: भाग घेत अनुभवली तर चौथ्या पिढीतले विश्वासराव आणि माधवराव यांना मोठे होताना पाहिले. बाळाजी विश्वनाथ व राधाबाई या दोघांच्या मृत्यूचे साल उपलब्ध आहे. त्याप्रमाणे बाळाजी विश्वनाथ इ. स. १७२० मधे व राधाबाई इ. स. १७५३ मधे स्वर्गवासी झाले. इतर उल्लेखांच्या संदर्भावरून अंदाजाने बाळाजीपंतांचे जन्मसाल इ. स. १६६० व राधाबाईंचे जन्मसाल १६७५ हे गृहीत धरले आहे.

राधाबाईंना सन १६७५ ते इ. स. १७५३ पर्यंत मिळालेल्या दीर्घायुष्यामुळे त्यांना संभाजीराजे, राजारामराजे आणि शाहूराजांची कारकीर्द जवळून अनुभवता आली. पहिल्या शाहूराजानंतर गादीवर आलेल्या रामराजांची सुरुवात त्यांना अवलोकता आली.

उपजत कुशाग्र बुद्धिमत्ता, परिस्थितीमुळे अंगावर पडलेली जबाबदारी, त्यातून उजळून निघालेली सुप्त कर्तबगारी, राजकारणाची उत्तम जाण आणि मुत्सद्दी स्वभाव या गुणविशेषांनी त्यांनी मराठी राजकारणात आणि भट घराण्यात आपला स्वतंत्र ठसा उमटवला, जाज्वल्य, दरारायुक्त स्वभावाने मुलांवर उत्तम संस्कार केले. थोरले बाजीराव आणि चिमाजीअप्पांना वेळोवेळी राजकारणातही मदत केली. बाजीराव मस्तानी प्रकरण क्लेशकारक झाले तरी विवेकी विचारांनी हाताळले.

'मराठी रियासत' वाचताना 'मातोश्री राधाबाईंशी' नुसती नजरओळख झाली होती. पेशवेदप्तर वाचायला घेतल्यावर मात्र त्यांच्याशी वरचेवर गाठ पडू लागली. त्यांनी लिहिलेल्या पत्रातून आणि त्यांना आलेल्या पत्रांमधून त्यांच्या स्वभावाचे पैलू नजरेत भरू लागले. यश, कीर्ती, दौलत यांनी भरलेले घर त्यांनी उपभोगले, तसेच दोन पराक्रमी, तरुण पुत्रांचे सहा महिन्याच्या कालावधीत, पाठोपाठ झालेले मृत्यू त्यांना क्लेश देऊन गेले. पण तरीही त्यानंतर या बाई खचलेल्या किंवा कोलमडलेल्या अनुभवायला मिळाल्या नाहीत. 'काशीयात्रा' हा त्यांच्या आयुष्यातला आणखी एक यशस्वी टप्पा होता.

पहिल्या शाहूराजांची गादीवर स्थापना होण्यापूर्वीपासून बाळाजी विश्वनाथ शाहूराजांच्या मागे एकनिष्ठपणे उभे राहिले. राजकारणात, पुढच्या दोन चाली आधीच योजून राजकीय बुद्धिबळपटावर बाळाजी विश्वनाथांनी आपलं कायम वर्चस्व ठेवलं.

शाहूराजांनी, गुणीजन हेरणे, त्यांच्यावर जबाबदारी टाकणे, त्यांच्या गुणांना प्रोत्साहन देणे, त्याचवेळी त्यांना वर्चस्वाखालीही ठेवणे या स्वभावविशेषांच्या जोरावर बेचाळीस वर्षे राज्य केले. गावकूस घालणे असो वा स्वारी–मोहीम असो, त्यांचा शब्द निर्णायक होता. त्यांनी स्वत: कधीही मोठ्या मोहिमांचे नायकत्व स्वीकारले नाही. मिरज–पुणे एवढ्या टापूच्या बाहेर प्रवास केला नाही तरी पेशव्यांच्या कर्तृत्वाला वाव देऊन मराठी राज्याच्या सीमा उत्तरेत यमुनेपर्यंत भिडवल्या. ह्या दयाघन राजाने स्वत:च्या अंगावर शस्त्र धरणाऱ्या मारेकऱ्यांना आपल्या माणसांपासून त्यांचे जीव वाचवण्यासाठी पळून जायला सांगितले. कुठल्याही गुन्हेगाराला त्यांनी कधीही 'मारा' हा हुकूम दिला नाही. या पुण्यश्लोक राजाची कारकीर्द लोकांना कळली पाहिजे असे वाटत राहिले.

एवढेच नव्हे तर त्याकाळचा लष्करी पेशा, त्यातील कटकटी, त्याकाळच्या श्रद्धा, अंधश्रद्धा, सामाजिक आणि राजकीय जीवनपद्धती सर्वांना कळावी असे वाटले.

म्हणूनच 'मातोश्री' हे राधाबाईंचे चरित्र आहेच, पण त्यांच्या प्रापंचिक आयुष्याचा आलेख रंगवताना त्या काळची शक्य होईल तेवढी सारी माहिती वाचकांना करून देणे, हाही उद्देश मनात ठेवला होता. राधाबाईंमुळे तत्कालीन राजकीय इतिहास लिहिणे अपरिहार्यच होते. कारण त्यांचे सर्व आयुष्य पेशव्यांच्या सहवासात गेले होते. त्यामुळे इतिहासलेखन आपोआप आले. शाहूमहाराजांचीही कारकीर्द रंजक मार्गाने सांगावी असा विचार केला.

या साऱ्यांचा, विचारांचा परिपाक म्हणजे 'मातोश्री' हे राधाबाईंचे चरित्र. शाहूमहाराजांची कारकीर्द, पेशव्यांच्या, अनेक सरदार घराण्यांच्या कर्तबगारीची तोंडओळख, मराठ्यांच्या दराऱ्याची माहिती आणि तत्कालीन सामाजिक–राजकीय–आर्थिक व्यवहारांचे चित्रण आहे. तसेच हे लेखन कादंबरीच्या अंगाने असले तरी कादंबरी लेखनात मूळ कथानकात बदल करण्याची जी सवलत असते तिचा फायदा करून घेतलेला नाही. बखरी,

आख्यायिका, पत्रे आणि प्रकाशित साहित्यांचा यात आधार घेतला आहे. अप्रकाशित साहित्याचा यामधे समावेश नाही.

'मराठी रियासत' हेच या लेखनाचे प्रेरणा स्थान आहे. शाहूमहाराज आणि बाळाजी विश्वनाथ पेशवे यांची कारकीर्द अज्ञात राहिली आहे असे वाटल्याने त्यांच्या काळातील घडामोडींचा आलेख सर्वांसमोर मांडावा हीच इच्छा मनात धरली आणि लेखन केले.

गेली काही वर्षे मातोश्री राधाबाई आणि शाहूराजांनी झपाटून टाकले होते. त्यांच्याच अज्ञात आशीर्वादांमुळे हे लेखन पार पडले आणि त्यातूनच मुक्ततेचा आनंद अनुभवायला मिळतो आहे हेच खरे.

**– डॉ. स्मिता दामले**